# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०२/०९/२०१९

## दि.०१/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४८७/१९,भादविक ४२०,४६५,४६८,४७१ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५५ वर्षे,रा.आजमगढ,उत्तर प्रदेश |
| **आरोपी** | एक इसम,वय-५८ वर्षे,रा.भाग्योदय शिवनेरी,कोंढवा,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०८/२०१९रोजी ते दि.२५/०८/२०१९ रोजीचे कालावधीत लुल्लानगर,वानवडी,पुणे परिसरात |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचा मुलगा, पुतन्या व पुतनी यांना एम.ई.एस,पुणे येथे नोकरी लावण्याचे आमिष दाखवुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,नमुद कालावधीत लुल्लानगर वानवडी परिसरात,फिर्यादी यांचेकडुन २,१०,०००/- रुपये घेवुन,फिर्यादी यांचा पुतण्या याचे नावाचे बनावट सह्या व स्टॅम्प मारलेले तयार नियुक्तीपत्र व सदर नियुक्ती पत्राच्या प्रतीची फिर्यादी यांना मोबाईल फोटो कॉपी देवुन,फिर्यादी यांचे नातेवाईकांना नोकरी न लावता,त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. आसाराम शेटे ९१५८८११६६६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७७५/१९,भादविक ३८७,३८४,५०६,५०४,४२७,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५० वर्षे,रा.पाषाण,पुणे |
| **आरोपी** | १.अक्षय परशुराम घोडके,वय-२२,रा.आदमाने वाडा,पाषाणद्,पुणे २.नितीन त्रिभुज वैध्य,वय-२० रा.संजय गांधी वसाहत,पाषाण,पुणे (अटक) व इतर एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०९/२०१९ रोजी पहाटे ०२/३० वा. पाषाण,पुणे येथील बेकरी मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हे फिर्यादी यांचेकडून यापुर्वी बेकरीतील केक व पैसे बळजबरीने घेवुन गेले होते. त्यानंतर सदर इसमांनी संगनमत करून,फिर्यादी यांचे बेकरीचा दरवाजा उघडण्यास सांगुन "आम्हाला आत्ताच्या आत्ता ५,०००/- रूपये दे,तु बेकरी कशी चालवतो तेच पाहतो,तुझी बेकरीच तोडुन टाकतो" अशा धमक्या देवुन,फिर्यादी यांचेकडे ५,०००/- रूपयेची मागणी केली. फिर्यादी यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने,त्यांनी फिर्यादी जीवे मारण्याची धमकी देवून,त्यांना शिवीगाळ करून,बेकरीचे बाहेरील दोन सीसीटीव्ही कॅमेरे व हिरो होन्डा पॅशन प्रो मोटार सायकल नं.MH12-JW-1838 व हिरा होंडा स्प्लेंडर मोटार सायकल नं.MH12-LN6133 या दोन गाडयांची तोडफोड करून नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राजेंद्र दहिफळे ९८८१५५४९९९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८८०/१९,भादविक ३५३,३२३,५०४,५०६,महाराष्ट्र पोलीस का.क. ११२/११७, मो.वा.का.क.११९/१७७ |
| **फिर्यादी** | राजाराम फडतरे, पोलीस हवालदार, हडपसर वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | १.वैभव दिलीप दिघे,वय-२२ वर्षे,रा.फुरसुंगी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०८/१९ रोजी २०/४५ वा.सार्वजनिक रोडवर चौकात मंतरवाडी फाटा फुरसुंगी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्याचे सहकारी याचेसह मंतरवाडी फाटा,पुणे-सासवड रोड,पुणे या ठिकाणी वाहतुकीची गर्दि झाल्याने वाहतुक सुरळीत करीत असतान,यातील नमुद इसमास त्याची मोटार सायकल बाजुला घेण्यास सांगितल्याचे कारणावरून,त्याने बाजुला न घेता फिर्यादी यांचेशी आरेरावीची भाषा करुन,त्याचे गाडी सार्वजनिक रोडवर तशीच उभी करुन वाहतुकीस अडथळा करून,फिर्यादी यांचेशी झटापट व धक्का-बुक्की केली. |

तसेच परत चौकात मारण्याची धमकी देवुन अपशब्द वापरून,सार्वजनिक रोडवर आरडा-ओरडा करुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. डी.डी.गाडे ८८८८८७९९६९

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** स्वारगेट पो स्टे ३९२/१९,भादविक ३७९

**फिर्यादी** एक महिला अधिकारी,वय-४८ वर्ष,(तलाठी),तहसिल कार्यालय,शुक्रवार पेठ,खडकमाळ आळी, पुणे शहर

**आरोपी** एक अनोळखी ट्रक चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०९/२०१९ रोजी १३/३० वा.सर्वे नं.२१/१७२,महर्षीनगर,पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद एका अनोळखी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक मध्ये कोणतीही परवाना व रॉयल्टी न भरता,अनधिकृतपणे, विनापरवाना अंदाजे ४ ब्रास वाळु कोठुनतरी चोरी करुन एका बांधकाम करणा-या इसमास सदरची वाळु ही विनापरवाना आसलेबाबत कोणतीही कल्पना न देता,त्याचे बांधकामाकरीता ट्रक मधील ४ ब्रास वाळु अनाधिकृतपणे खाली करीता असताना ट्रक मिळुन आला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. लोहोटे ८८८८०९००८८

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** भारती विद्यापीठ पो स्टे ५८९/१९,भादविक ३७९

**फिर्यादी** एक पुरुष,वय-३० वर्षे,रा.गोकुळनगर,पुणे

**आरोपी** अज्ञात इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२५/०८/२०१९ रोजी सकाळी ०९/४५ ते १७/३० वा.चे दरम्यान माऊली गार्डन मंगल कार्यालय,माऊलीनगर कात्रज-कोंढवा रोड,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे लहान भाऊ यांचे लग्नकार्य असल्याने,त्यांनी नवरदेवाच्या रुम मध्ये ठेवलेले लाल रंगाच्या बॅग मध्ये फिक्कट निळ्या रंगाच्या पिशवी मधील २,६२,०००/- रु किचे सोन्याचे दागिने,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांची नजर चुकवुन चोरुन नेले आहेत.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.एच.मचाले ९५६१४५७३३६

## दि.०२/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

**पो.स्टे.गुरनं./कलम** चतुःश्रृंगी पो स्टे ७७६/१९,भादविक ३०२,३२४,३२३,५०४,३४,महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७(१)१३५, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५)

**फिर्यादी** रामप्रभु मोटे,वय-३९ वर्षे,रा.म्हाळुंगे,ता.मुळशी,जि.पुणे

**आरोपी** एकुण तीन इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०९/२०१९ रोजी १७/१५ वा.स्वरा पान स्टॉल,डी.मार्ट समोर,बाणेर,म्हाळुंगे रोडलगत बाणेर,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा भाचा संतोष नरहरी कदम,वय-३२ वर्षे,रा.म्हाळुंगे,ता.मुळशी,जि.पुणे याचे स्वरा पान स्टॉलचे दुकान असुन,यातील नमुद इसमांनी त्याचे दुकानात येवुन सिगारेट मागितली. संतोष याने त्यांना सिगारेट दिल्यानंतर त्याचे पैसे मागितल्याचे कारणावरून,सदर इसमांपैकी एका ब्लॅक्या नावाचे इसमाने त्याचे हातातील गुप्ती संतोष याचे पोटात खुपसून जीवे ठार मारले आहे. तसेच त्याच इसमाने त्याचे साथीदारांकडुन कोयत्या घेवुन,फिर्यादी यांचे डाव्या हाताचे दंडावर व उजव्या हाताचे अंगठया जवळ कोयत्याने वार करून जखमी केले आहे.

**त.अंमलदार** पोलीस निरीक्षक,(गुन्हे), वैशाली गलांडे ९०११०३७७६२

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**